मौलाना आज़ाद अल्पसंख्याक आर्थिक विकास महामंडळ मर्यादित, मुंबई
مولانا آزاد اقلیتی مالیاتی ترقیاتی کارپوریشن لیمٹیڈ، ممبئی
MAULANA AZAD MINORITIES FINANCIAL DEVELOPMENT CORPORATION LTD., MUMBAI
MINORITIES DEVELOPMENT DEPARTMENT, MANTRALAYA, MUMBAI
GOVT OF MAHARASHTRA U/T
Head Office : 2nd Floor, D. D. Building, Old Customs House Shahid Bhagat Singh Road, Fort, Mumbai - 400023.
Tel No 022-22672293/ 22653080/ 22672294, email : mamfdc_ho@rediffmail.com, website : www.mamfdc.maharashtra.gov.in

जा.क्र.मौआम/का.आ./२०२१/९६४५ दिनांक २३ /१०/२०२१.

प्रति,
सर्व जिल्हा व्यवस्थापक,
सर्व सहाय्यक व्यवस्थापक,
सर्व लिपीक टंकलेखक,
जिल्हा कार्यालय -

**विषय : नागरिकांची सनद प्रसिद्ध करण्याबाबत...**

उपरोक्त विषयान्वये आपणास कळविण्यात येते की, राज्य शासनाच्या निर्देशानुसार शासनाच्या सर्व कार्यालयामध्ये नागरिकांची सनद तयार करुन त्याप्रमाणे कार्यवाही करणे अनिवार्य आहे. सदर सनदेमध्ये संबंधित विभागातील अधिकारी / कर्मचारी यांना झालेल्या कामाचे वाटप व संबंधित कामे पूर्ण करावयाचा कालावधी या बाबतची माहिती देण्यात आली आहे.

महामंडळाच्या सर्व अधिकारी / कर्मचारी यांना सनदेमध्ये दर्शविल्याप्रमाणे विहित कालावधीत आपल्या अधिनस्त असलेली सेवा अल्पसंख्याक समाजाच्या व्यक्तींना पुरवावी. अतिरिक्त जिल्ह्यांचा कार्यभार सोपविण्यात आलेल्या सर्व जिल्हा व्यवस्थापकांनी त्यांच्या अधिनस्त जिल्ह्यातील कामकाज त्यांना ठरवून दिलेल्या कालावधीमध्ये पार पाडावे. या सनदेनुसार कार्यवाही न करणाऱ्या अधिकारी / कर्मचारी यांच्यावर नियमानुसार शास्ती अथवा दंड लादण्याचे प्रयोजन आहे. महामंडळाचे सर्व अधिकारी / कर्मचारी यांनी त्यांना ठरवून दिलेल्या कालावधीमध्ये आपल्या अधिनस्त सेवा नागरिकांना / लाभार्थ्यांना उपलब्ध करुन द्याव्यात.

सोबत: नागरिकांच्या सनदेची प्रत.

अ.र.कारदार
( अ.र. कारदार )
उप व्यवस्थापक

मौलाना आझाद अल्पसंख्याक आर्थिक विकास महामंडळ मर्या. मुंबई
Maulana Azad Minorities Financial Development Corporation Ltd
Reg. No. 11-128912
रजि. न 11-128912

O/C

# नागरिकांची सनद तपासणी सूची

| अ. क्र. | मुद्दा | |
|---|---|---|
| १ | नागरिकांची सनद कोणत्या विभागाची आहे? | मौलाना आजाद अल्पसंख्याक आर्थिक विकास महामंडळ मुंबई. डी.डी. बिल्डिंग, २ रा मजला, जुने जकात घर, शहीद भगतसिंग मार्ग, मुंबई- ४०००२३.<br>अल्पसंख्याक विकास विभाग (महाराष्ट्र शासनाचा उपक्रम) |
| २. | विभागांतर्गत एकूण किती कार्यालये आहेत? | ३५ जिल्हा कार्यालये :-<br>शासन निर्णय, अल्पसंख्याक विकास विभाग, दिनांक १२ जून, २०१३ अन्वये ३५ जिल्हा कार्यालयांसाठी पदे मंजूर करण्यात आलेली आहेत. त्यानुसार महामंडळाची सद्य:स्थितीत ३१ जिल्हा कार्यालयामध्ये स्वत:ची कार्यालये स्थापन केलेली आहेत. महामंडळाची सध्या ३१ जिल्हा कार्यालये खालीलप्रमाणे कार्यरत आहेत. १)मुंबई (शहर व उपनगर), २)ठाणे व पालघर, ३)रायगड, ४)रत्नागिरी, ५)नाशिक, ६)अहमदनगर, ७)नंदूरबार, ८)धुळे, ९)जळगाव १०)पुणे, ११)सोलापूर, १२)सांगली, १३)सातारा, १४)कोल्हापूर, १५)औरंगाबाद, १६)परभणी, १७)लातूर, १८)बीड, १९)उस्मानाबाद, २०)नांदेड, २१)हिंगोली, २२)जालना २३)अमरावती, २४)बुलडाणा, २५)वाशिम, २६)अकोला, २७)यवतमाळ, २८)नागपूर, २९)चंद्रपूर, ३०)वर्धा, ३१)भंडारा.<br><br>* मुंबई शहर व मुंबई उपनगर या दोन जिल्ह्यांचे एकाच कार्यालयामधून कामकाज हाताळले जाते.<br>* ठाणे व पालघर या दोन जिल्ह्यांचे एकाच कार्यालयामधून कामकाज हाताळले जाते.<br>* सिंधुदुर्ग जिल्ह्याचे कामकाज जिल्हा कार्यालय, रत्नागिरी येथून हाताळण्यात येत आहे.<br>* गडचिरोली व गोंदिया या दोन जिल्ह्याचे कामकाज जिल्हा कार्यालय, चंद्रपूर येथून हाताळण्यात येत आहे.<br><br>या कार्यालयात कार्यरत असणाऱ्या जिल्हा व्यवस्थापक यांना उर्वरित १३ जिल्हयांचा अतिरिक्त कार्यभार देण्यात आला आहे. |

| | | |
|---|---|---|
| ३. | त्यापैकी किती क्षेत्रीय कार्यालयांनी नागरिकांची सनद तयार केली ? | सर्व जिल्हा कार्यालये |
| ४. | नागरिकांची सनद कशाबाबत आहे ? सनद विहित नमुन्यात आहे काय ? | सेवा पुरविण्याबाबत आहे तसेच सनद विहित नमुन्यात आहे. |
| ५. | या विभागांमार्फत कोणत्या सेवा पुरविल्या जातात ? | महामंडळामार्फत अल्पसंख्याक समाजातील बेरोजगारांना खालील योजनांतर्गत अल्प व्याजदराने कर्ज उपलब्ध करुन दिले जाते.<br>१)मुदत कर्ज योजना<br>२)डॉ.ए.पी.जे. अब्दुल कलाम शैक्षणिक कर्ज योजना<br>३)मौलाना आजाद शैक्षणिक कर्ज योजना<br>४)सुक्ष्म पतपुरवठा योजना<br>अल्पसंख्याक समुह विकास कार्यक्रम (राष्ट्रीय अल्पसंख्याक विकास एवं वित्त निगम, नवी दिल्ली यांच्या मान्यतेनुसार) |
| ६. | कोणत्या कायद्यानुसार / नियमानुसार / शासन निर्णयानुसार ? | शासन निर्णय, क्रमांक - ईएसई-२०००/प्र.क्र.१५७/ रोस्वरो-१, रोजगार व स्वयंरोजगार विभाग, दिनांक २० नोव्हेंबर, २००० अन्वये कंपनी कायदा, १९५६ नुसार कंपनी कायद्यांतर्गत स्थापना झालेली आहे. |
| ७. | या सेवा कोणाला दिल्या जातात ? | अल्पसंख्याक समाजातील मुस्लिम, शिख, ख्रिश्चन, पारशी, बौध्द, जैन व ज्यू या धर्मातील व्यक्तींना दिल्या जातात. |
| ८. | कशाप्रकारे ? | आर्थिक व शैक्षणिक ऊन्नतीसाठी विविध कर्ज योजनेअंतर्गत अल्प व्याज दराने कर्ज पुरवठा केला जातो.<br>१)आर्थिकदृष्टया मागासलेल्या अल्पसंख्याकांच्या सामाजिक व आर्थिक उन्नतीसाठी विविध कर्ज योजना, प्रशिक्षण योजना राबविणे.<br>२)अल्पसंख्याक आर्थिकदृष्टया दुर्बल घटकातील सुशिक्षित बेरोजगारांना व्यवसायासाठी कर्ज स्वरुपात सहाय्य देणे.<br>३)अल्पसंख्याक समाजातील विद्यार्थी-विद्यार्थीनींना शिक्षणासाठी कर्ज उपलब्ध करुन देणे.<br>४)व्यवसाय / व्होकेशनल ट्रेनिंग देणे.<br>५)अल्पसंख्याक समुहातील महिलांच्या आर्थिक उन्नतीसाठी सुक्ष्म पतपुरवठा योजना राबविणे. |

| | | |
|---|---|---|
| ९. | सेवा कोण देते ? | मौलाना आजाद अल्पसंख्याक आर्थिक विकास महामंडळ मर्यादित, मुंबई. |
| १०. | जर या सेवा दिल्या नाहीत तर कोणाकडे दाद मागायची? | व्यवस्थापकीय संचालक, मौलाना आजाद अल्पसंख्याक आर्थिक विकास महामंडळ मर्यादित, मुंबई. |
| ११. | यात कोणत्या प्रकारची बंधने असतील ? | महामंडळामार्फत राबविण्यात येणाऱ्या विविध कर्ज योजनेअंतर्गत आवश्यक असलेल्या कागदपत्रांची पुर्तता करणे, संबंधित अर्जदारांवर बंधनकारक असेल / राहील. |
| १२. | सेवा पुरविण्याच्या कार्यपध्दतीचे मुल्यमापन कसे करायचे ? | सेवा पुरविण्याच्या कार्यपध्दतीत अर्जदारांची पात्र/पात्रता तपासून विहित मुदतीत कर्ज मंजूर करणे व वितरित करणे. |
| १३. | नागरिकांची सनद किती मुदतीपर्यंत कधीपर्यंत अस्तित्वात राहील ? | नागरिकांची सनद कायम स्वरुपी / पुढील शासकीय आदेश मिळेपर्यंत अस्तित्वात राहील. |
| १४. | **नागरिकांच्या सनदेमधील महत्वाचे मुद्दे व माहिती खालीलप्रमाणे :-**<br>१) प्रस्तावना :- सनदेचा थोडक्यात उद्देश<br>२) खाते :- रचना<br>:- अधिकार पद परंपरा<br>३) हाताळलेले महत्वाचे नियम<br>४)पुरविल्या जाणाऱ्या सेवा :- सनदेमध्ये उल्लेखिलेल्या सेवांचा तपशील. | परिशिष्ट-१ प्रमाणे |
| १५. | **कायदा / नियम / शासन निर्णय :-**<br>१) कायदे / नियम / शासन निर्णय ज्या अंतर्गत या सेवा पुरविल्या जाणार आहेत<br>२) थोडक्यात कार्यपध्दती | परिशिष्ट-१ प्रमाणे |
| १६. | **दर्जाबद्दलची जबाबदारी / वचन :-**<br>- सेवा देण्याची व्यवस्था करण्याचा कालावधी<br>- सेवेचा दर्जा | परिशिष्ट-१ प्रमाणे |

| | | |
|---|---|---|
| १७. | **अधिकारी / कर्मचारी**<br>- सक्षम अधिकारी<br>- कर्मचारी - ज्यांच्याकडे अर्ज करावयाचा आहे.<br><br><br><br>- सेवा ज्यांच्याकडून घ्यायच्या ते कर्मचारी<br><br>- अधिकारी / कर्मचारी यांची नावे | **मुख्यालय**<br>- सक्षम अधिकारी - व्यवस्थापकीय संचालक<br>- ज्यांच्याकडे अर्ज करावयाचा - विविध विभागाचे उप व्यवस्थापक / सहाय्यक व्यवस्थापक<br>- परिशिष्ट-१ प्रमाणे<br><br>**जिल्हा कार्यालय**<br>- सक्षम अधिकारी - व्यवस्थापकीय संचालक<br>- ज्यांच्याकडे अर्ज करावयाचा - जिल्हा व्यवस्थापक (संबंधित जिल्हा)<br>- सेवा ज्यांच्याकडून घ्यायच्या आहेत ते सहाय्यक व्यवस्थापक (जिल्हा कार्यालय) व लिपिक-टंकलेखक. |
| १८. | **नागरिकांना माहिती पुरविणे :-**<br>- विशिष्ट सेवा मिळविण्यासाठी नागरिकांची पात्रता<br>- अर्जाचा मान्यताप्राप्त नमुना<br>- अर्ज कुठे उपलब्ध आहे ?<br><br><br><br>- अर्जाची किंमत असल्यास किती ?<br>- शुल्क भरावे लागते का ? किती ?<br><br><br><br>- कोणती कागदपत्रे जोडायची ?<br><br>- सेवा मिळण्याचे ठिकाण | - परिशिष्ट-१ प्रमाणे<br><br>- शैक्षणिक कर्ज योजनेअंतर्गत Online पध्दतीने अर्ज करणे आवश्यक असून सदर अर्ज महामंडळाचे संकेतस्थळ www.mamfdc.maharashtra.gov.in व https://malms.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध आहे.<br>- सुक्ष्म पतपुरवठा योजनेचे अर्ज सर्व जिल्हा कार्यालयांमध्ये उपलब्ध करुन देण्यात आलेले आहेत.<br><br>- शैक्षणिक कर्ज योजनेसाठीचे अर्ज विनाशुल्क उपलब्ध आहेत.<br>- सुक्ष्म पतपुरवठा योजनेअंतर्गत अर्जासाठी रु.२०/- इतके शुल्क आकारण्यात येते व कर्ज मंजूरीनंतर वैधानिक दस्तऐवज सादर करताना रु.५००/- इतके शुल्क जिल्हा कार्यालयामध्ये जमा करुन त्याबाबतची पावती प्राप्त करुन घेणे आवश्यक आहे.<br><br>- अर्जासोबत परिशिष्ट-१ प्रमाणे जे कागदपत्रे जोडणे आवश्यक आहे.<br><br>- जिल्हा कार्यालये. |

मौलाना आझाद अल्पसंख्याक आर्थिक विकास महामंडळ मर्या. Maulana Azad Minorities Financial Development Corporation Ltd. Reg. No. 11-128912 नों. क्र. 11-128912

| | | |
|---|---|---|
| १९. | **योग्ययोग्यता ठरविण्याचा अधिकार:-**<br>- जर एखाद्या सेवेची योग्ययोग्यता ठरविण्यासंबधी तरतूद असले तर तसे उल्लेख करणे. | सन्मा.संचालक मंडळ व व्यवस्थापकीय संचालक, मौलाना आजाद अल्पसंख्यांक आर्थिक विकास महामंडळ, मुंबई. |
| २०. | **बंधने व मर्यादा :-**<br>-अनपेक्षित घटना - उदा.मोठया प्रमाणावर उद्भवलेली नैसर्गिक आपत्ती किंवा कायदा व सुव्यवस्थेचे प्रश्न. | शासनाने दिलेल्या मान्यतेनुसार, सन्मा.संचालक मंडळाने ठरवुन दिलेल्या तसेच राष्ट्रीय अल्पसंख्यांक वित्त महामंडळ, नवी दिल्ली यांच्या मार्गदर्शक तत्त्वानुसार विविध योजनांतर्गत कर्ज वाटप करण्यास बंधने / मर्यादा आहेत. |
| २१. | **तक्रारीचे निवारण :-**<br>-कोणत्या बाबतीत तक्रार उद्भवू शकेल ?<br>- कोणाशी संपर्क साधायचा ? | कर्ज प्रकरणा संबंधित.<br><br>व्यवस्थापकीय संचालक, मौलाना आजाद अल्पसंख्यांक आर्थिक विकास महामंडळ, मुंबई. |

मौलाना आजाद अल्पसंख्यांक आर्थिक विकास महामंडळ मर्या. मुंबई
Maulana Azad Minorities Financial Development Corporation Ltd.
सत्यमेव जयते
Reg. No. 11-128912

मौलाना आझाद अल्पसंख्याक आर्थिक विकास महामंडळ मर्यादित, मुंबई
مولانا آزاد اقلیتی مالیاتی ترقیاتی کارپوریشن لیمٹیڈ، ممبئی
MAULANA AZAD MINORITIES FINANCIAL DEVELOPMENT CORPORATION LTD., MUMBAI
MINORITIES DEVELOPMENT DEPARTMENT MANTRALAYA MUMBAI
GOVT OF MAHARASHTRA U/T

Head Office 2nd Floor D D Building Old Customs House Shahid Bhagat Singh Road Fort Mumbai 400023
Tel No 022-22672293/ 22653080 22672294 email mamfdc_ho@rediffmail.com website www.mamfdc.maharashtra.gov.in

# नागरिकांची सनद

## प्रस्तावना -

राज्यातील अल्पसंख्यक समाजातील आर्थिकदृष्टया दुर्बल घटकांच्या उन्नतीसाठी शासनाने मौलाना आजाद अल्पसंख्याक आर्थिक विकास महामंडळ मर्यादित या महामंडळाची स्थापना केली आहे. त्यास अनुसरुन महामंडळाची कंपनी कायदा १९५६ अन्वये दिनांक २८ सप्टेंबर, २००० रोजी नोंदणी करण्यात आलेली आहे. महाराष्ट्र राज्यातील एकूण ११ कोटी लोकसंख्येपैकी (मुस्लिम, ख्रिश्चन, बौध्द, शीख, पारसी, जैन व ज्यू) १९ टक्के लोकसंख्या अल्पसंख्याक समाजातील आहे. मुस्लिम, ख्रिश्चन, बौध्द, शीख, पारसी, जैन व ज्यू या धार्मिक समुहांचा अल्पसंख्याक समाज म्हणून शासनाने दिनांक ०६/१०/२००६ रोजीच्या शासन अधिसूचनेन्वये घोषित केलेले आहे. अल्पसंख्याक समाजाच्या विकासासाठी असलेल्या राज्यातील कल्याणकारी योजना वेगवेगळया प्रशासकीय विभागाद्वारे राबविण्यात येत होत्या. या योजना प्रभावीपणे व कालबध्दपणे राबविण्यासाठी मौलाना आजाद अल्पसंख्याक आर्थिक विकास महामंडळाची स्थापना करण्यात आली आहे. हे महामंडळ राष्ट्रीय अल्पसंख्याक विकास एवं वित्त निगम, नवी दिल्ली यांची राज्य वाहिनीकृत यंत्रणा म्हणून कार्यरत आहे. राष्ट्रीय अल्पसंख्याक विकास एवं वित्त निगम, नवी दिल्ली यांच्यामार्फत राबविण्यात येणाऱ्या विविध योजनांची अंमलबजावणी या महामंडळामार्फत महाराष्ट्र राज्यामध्ये करण्यात येते.

**महामंडळाची उद्दिष्टे :-**

१) आर्थिकदृष्टया मागासलेल्या अल्पसंख्याकांच्या सामाजिक व आर्थिक उन्नतीसाठी विविध कर्ज योजना, प्रशिक्षण योजना राबविणे.

२) अल्पसंख्याक आर्थिकदृष्टया दुर्बल घटकातील सुशिक्षित बेरोजगारांना व्यवसायासाठी कर्ज स्वरुपात सहाय्य देणे.

३) अल्पसंख्याक समाजातील विद्यार्थी - विद्यार्थीनींना शिक्षणासाठी कर्ज उपलब्ध करुन देणे.

४) व्यवसाय / व्होकेशनल ट्रेनिंग देणे.

५) अल्पसंख्याक समुहातील महिलाच्या आर्थिक उन्नतीसाठी सुक्ष्म पतपुरवठा योजना राबविणे.

**महामंडळाचे भागभांडवल :-**

१) महामंडळाचे प्राधिकृत भागभांडवल **रु.५००.०० कोटी** आहे.

२) सन २००१ ते दिनांक ३१ मार्च, २०२१ पर्यंत महाराष्ट्र शासनाने महामंडळास **रु.४८३.१९१० कोटी** एवढे भागभांडवल अदा केले आहे.

| | | |
|---|---|---|
| १९. | **योग्ययोग्यता ठरविण्याचा अधिकार:-**<br>- जर एखाद्या सेवेची योग्ययोग्यता ठरविण्यासंबधी तरतूद असले तर तसे उल्लेख करणे. | सन्मा.संचालक मंडळ व व्यवस्थापकीय संचालक, मौलाना आजाद अल्पसंख्यांक आर्थिक विकास महामंडळ, मुंबई. |
| २०. | **बंधने व मर्यादा :-**<br>-अनपेक्षित घटना - उदा.मोठया प्रमाणावर उद्‌भवलेली नैसर्गिक आपत्ती किंवा कायदा व सुव्यवस्थेचे प्रश्न. | शासनाने दिलेल्या मान्यतेनुसार, सन्मा.संचालक मंडळाने ठरवुन दिलेल्या तसेच राष्ट्रीय अल्पसंख्यांक वित्त महामंडळ, नवी दिल्ली यांच्या मार्गदर्शक तत्त्वानुसार विविध योजनांतर्गत कर्ज वाटप करण्यास बंधने / मर्यादा आहेत. |
| २१. | **तक्रारीचे निवारण :-**<br>-कोणत्या बाबतीत तक्रार उद्‌भवू शकेल ?<br>- कोणाशी संपर्क साधायचा ? | कर्ज प्रकरणा संबंधित.<br><br>व्यवस्थापकीय संचालक, मौलाना आजाद अल्पसंख्यांक आर्थिक विकास महामंडळ, मुंबई. |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| २. | डॉ.ए.पी.जे. अब्दुल कलाम शैक्षणिक कर्ज योजना | रु.५.०० लाखापर्यंत | १००% कर्ज | ३% | ५ वर्षे |
| ३. | सुक्ष्म पतपुरवठा योजना | रु.२,००,०००/- प्रति गट | | ५% | ३६ महिन्यात १२ त्रैमासिक हप्ते |

**३.१ पात्रता**

- ➪ अर्जदार अल्पसंख्याक समाजातील असावा. (मुस्लिम, शिख, ख्रिश्चन, पारशी, बुद्धीष्ट, जैन व ज्यू समाजाचा समावेश.)
- ➪ अर्जदार महाराष्ट्रातील रहिवासी असावा.
- ➪ अर्जदार कमीत कमी साक्षर असावा.
- ➪ अर्जदाराची सर्वसाधारण वयोमर्यादा किमान १८ वर्षे.
- ➪ डॉ.ए.पी.जे. अब्दुल कलाम शैक्षणिक कर्ज योजनेसाठी वयोमर्यादा १६ ते ३२ वर्ष.
- ➪ मौलाना आजाद शैक्षणिक कर्ज योजनेसाठी वयोमर्यादा १८ ते ३२ वर्ष.

**कुटुंबाचे वार्षिक उत्पन्न (राज्य शासन पुरस्कृत योजनेसाठी)**

अ) शहरी भागासाठी व ग्रामीण भागासाठी - रु.८,००,०००/- पेक्षा कमी.

**कुटुंबाचे वार्षिक उत्पन्न (केंद्र शासन पुरस्कृत योजनेसाठी)**

ब) शहरी भागासाठी - रु.१,२०,०००/- पेक्षा कमी, ग्रामीण भागासाठी - रु.९८,०००/- पेक्षा कमी.

**३.२ आवश्यक कागदपत्रे :-**

- ➪ विहित नमुन्यातील अर्जाबरोबर दोन संच साक्षांकित करुन कागदपत्रे जोडावी.
- ➪ अल्पसंख्यांक असल्याचा पुरावा (शाळा सोडल्याचा दाखला किंवा जात प्रमाणपत्र)
- ➪ रहिवासी प्रमाणपत्र (आधार कार्ड / रेशनकार्ड / पारपत्रक / बँकेचे पासबुक / वाहन चालक परवाना / दूरध्वनी देयक / विद्युत देयक / इलेक्शन कार्ड /डोमिसाईल सर्टिफिकेट) यापैकी कोणतेही एक.
- ➪ भाडेपत्र / संमतीपत्र / नोटरी (योजनेच्या आवश्यकतेनुसार)
- ➪ मालाचे दरपत्रक (मुदत कर्ज योजना)
- ➪ बेबाकी प्रमाणपत्र व प्रतिज्ञापत्र
- ➪ सक्षम जामिनदार - वेतन प्रमाणपत्र / मालमत्तेची माहिती, मिळकतीचे मुल्यांकन पत्र.
- ➪ उत्पन्न प्रमाणपत्र - कुटुंब प्रमुखाच्या नावे तहसिलदार यांनी निर्गमित केलेला उत्पन्नाचा दाखला.

**नोट :-**दारिद्र्य रेषेखालील उमेदवारांनी रेशनकार्ड जोडावे. रेशनकार्डवरील उत्पन्न ग्राह्य धरले जाईल.

महामंडळाच्या योजनेबाबतची आवश्यक ती कागदपत्रे संबंधित योजनेच्या अर्जामध्ये नमूद करण्यात आलेली आहेत तसेच योजनानिहाय आवश्यक त्या कागदपत्रांची माहिती महामंडळाच्या संकेतस्थळावर उपलब्ध करुन दिलेली आहेत.

**३.३ लक्षांक :**

महामंडळामार्फत राबविण्यात येणाऱ्या दोन्ही शैक्षणिक कर्ज योजनेअंतर्गत प्राप्त होणाऱ्या सर्व पात्र विद्यार्थ्यांना कर्ज मंजूर करुन वितरित करण्यात येते. इतर व्यावसायिक कर्ज योजनांबाबत जिल्हानिहाय अल्पसंख्याकांचा लक्षांक निश्चित करुन प्रस्तावित कर्ज मंजुरीला प्राधान्य देण्यात येते. जिल्हानिहाय, योजनानिहाय, अल्पसंख्यांकांचा समुहनिहाय लक्षांक निश्चित करुन कर्ज मंजुर करण्यात येईल.

**४) कार्यपुर्तीचे वेळापत्रक -**

मौलाना आजाद अल्पसंख्याक आर्थिक विकास महामंडळामार्फत पुरविण्यात आलेल्या सेवांच्या कार्यपुर्तीच्या वेळापत्रक **परिशिष्ट-२** मध्ये सादर करण्यात आलेले आहे.

**५) नियम / शासन निर्णय / संचालक मंडळाचे ठराव -**

महामंडळामार्फत राबविण्यात येणाऱ्या योजनांबाबतची माहिती महामंडळाचे संकेतस्थळ www.mamfdc.maharashtra.gov.in या संकेत स्थळावर उपलब्ध आहे. सदर वेबसाईटवर अधिकारी/ कर्मचारी यांचे संपूर्ण नांव, पदनाम, भ्रमणध्वनी क्रमांक व जिल्हास्तरीय महामंडळाचे कार्यालयीन पत्ते उपलब्ध आहे. महामंडळाच्या मुदत कर्ज योजना, डॉ.ए.पी.जे. अब्दुल कलाम शैक्षणिक कर्ज योजना, मौलाना आजाद शैक्षणिक कर्ज योजना व सुक्ष्म पतपुरवठा योजनेसंबंधी संपूर्ण तपशीलवार माहिती देण्यात आली आहे. कार्यालयीन आदेश व योजनांसंदर्भातील इतर आवश्यक ती माहिती महामंडळाच्या संकेत स्थळावर उपलब्ध आहे.

**६)(अ) गाऱ्हाणी / तक्रारी यांचे निराकरण -**

कार्यपुर्तीस होणारा विलंब व अन्य काही गाऱ्हाणी असल्यास त्यासंबंधी **परिच्छेद-२** मध्ये नमुद केलेल्या अधिकाऱ्यांकडे तक्रार नोंदविता येईल व तक्रार प्राप्त झाल्यापासून सात दिवसात त्याची पुर्तता करण्याची जबाबदारी संबंधित अधिकाऱ्याची राहील. यानंतरही नागरिकांचे समाधान न झाल्यास संबंधित अपर मुख्य सचिव, प्रधान सचिव तथा सचिव, अल्पसंख्याक विकास विभाग यांच्याकडे याबाबत तक्रार करता येईल. गाऱ्हाणी समक्ष भेटीत / पत्राने तथा ई-मेल द्वारेही मांडता येतील.

**(ब) नागरिकांच्या सनदेचा आढावा / सिंहावलोकन -**

नागरिकांच्या सनदेच्या उपयुक्ततेबाबत तथा परिणामकारकतेचा आढावा मौलाना आजाद अल्पसंख्याक आर्थिक विकास महामंडळाकडून दरवर्षी घेण्यात येईल व त्यात आवश्यकतेनुसार बदल करण्यात येतील.

**(क) जनसामान्यांकडून सूचना -**

ही नागरिकांची सनद सर्वसामान्य नागरिकांच्या छाननीसाठी नेहमीच खुली असेल व सन्मा.नागरिकांच्या बहुमुल्य सूचनांचा गांभीर्यपुर्वक विचार करुन व नागरिकांकडून मिळणारा प्रतिसाद पाहुन वेळोवेळी बदल करण्यात येईल.

**७) नागरिकांच्या सनदेची अंमलबजावणी -**

मौलाना आजाद अल्पसंख्याक आर्थिक विकास महामंडळ नागरिकांच्या या सनदेची अंमलबजावणी करण्यास कटिबद्ध आहे. महामंडळ आपल्या अधिपत्याखालील सेवा कर्तव्य भावनेने व कार्यतत्परतेने करुन देण्याची हमी देत आहे. या सेवा पुरविताना नागरिकांना सौजन्यपुर्व वागणुक देण्याची जबाबदारी महामंडळाच्या मुख्यालय / जिल्हा कार्यालयातील प्रत्येक अधिकारी / कर्मचारी यांची राहील.

## परिशिष्ट-१

# मौलाना आजाद अल्पसंख्याक आर्थिक विकास महामंडळ मर्यादित, मुंबई

### अध्यक्ष

| अ.क्र. | व्यवस्थापकीय संचालक |
|---|---|
| १ | **प्रशासन विभाग -**<br><br>प्रशासकीय विभागाची आस्थापना, रजा, प्रशिक्षण, गोपनीय अभिलेख, रचना व कार्यपध्दती, महामंडळाच्या नियंत्रणाखाली जिल्हा कार्यालयांची देखरेख इ. |
| २ | **प्रकल्प विभाग -**<br><br>प्राप्त झालेल्या कर्ज प्रस्तावांची छाननी करणे, संचालक मंडळाची मान्यता घेणे, मंजुरी पत्र पाठविणे, वैधानिक दस्तऐवज प्राप्तीनंतर कर्जाची रक्कम NEFT द्वारे वितरित करणे. |
| ३ | **लेखा विभाग -**<br><br>मुख्यालय व जिल्हा कार्यालयातील संबंधित लेखा विषयक बाबींचे कामकाज पाहणे, लेखा परिक्षण व रोख शाखा, लेखा परिक्षण अहवाल छपाई व शासनास सादर करणे. |
| ४ | **माहिती विभाग -**<br><br>माहिती अधिकार अधिनियम, २००५ अन्वये प्राप्त अर्जावर उचित कालमर्यादेत कार्यवाही करणे. |

# मौलाना आजाद अल्पसंख्याक आर्थिक विकास महामंडळ मर्यादित, मुंबई

## - महामंडळाच्या योजना -

| अ. क्र. | विभागाकडून / कार्यालयाकडून पुरविली जाणारी सेवा | आवश्यक कागदपत्रांची पुर्तता केल्यानंतर किती कालावधीत सेवा पुरविली जाते | सेवा पुरविणारे अधिकारी / कर्मचारी (दालन क्र. व दूरध्वनी क्र./ विस्तार क्र.) | सेवा पुरविण्याच्या कार्यपध्दतीचे मुल्यमापन | सेवा विहित कालावधीत पुरविली न गेल्यास ज्यांच्याकडे तक्रार करता येईल तो अधिकारी व त्याचा दूरध्वनी क्रमांक |
|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ |
| **विविध कर्ज योजना (मुदत कर्ज योजना, डॉ.ए.पी.जे. अब्दुल कलाम शैक्षणिक कर्ज योजना, मौलाना आजाद शैक्षणिक कर्ज योजना व सुक्ष्म पतपुरवठा योजना इ.)** | | | | | |
| १ | कर्ज प्रकरणे स्विकारणे | परिपुर्ण अर्ज त्याच दिवशी | जिल्हा व्यवस्थापक/ प्र.जिल्हा व्यवस्थापक | -- | व्यवस्थापकीय संचालक |
| २ | कर्ज प्रकरणांची छाननी करणे | १० दिवस | जिल्हा व्यवस्थापक/ प्र.जिल्हा व्यवस्थापक | -- | व्यवस्थापकीय संचालक |
| ३ | जिल्हा स्तरावरील छाननी अंती पात्र ठरणारे प्रस्ताव / अर्ज मुख्यालयास पाठविणे | परिपुर्ण अर्ज त्याच दिवशी | जिल्हा व्यवस्थापक/ प्र.जिल्हा व्यवस्थापक | -- | व्यवस्थापकीय संचालक |
| ४ | मंजूरी पत्र निर्गमित करणे. | ०८ दिवस (कर्ज प्रस्ताव मुख्यालयास प्राप्त झाल्यावर) | सहाय्यक व्यवस्थापक (प्रकल्प शाखा) | -- | व्यवस्थापकीय संचालक |
| ५ | वैधानिक दस्तऐवज व आगावू दिनांकित धनादेशाबाबतचा अहवाल मुख्यालयास सादर करणे. | परिपुर्ण अहवाल त्याच दिवशी | जिल्हा व्यवस्थापक/ प्र.जिल्हा व्यवस्थापक | -- | व्यवस्थापकीय संचालक |
| ४ | कर्जाची रक्कम वितरित करणे | मुख्यालयात वैधानिक दस्तऐवज व आगावू दिनांकित धनादेशाबाबतचा अहवाल प्राप्त झाल्यानंतर ०८ दिवस | सहाय्यक व्यवस्थापक (प्रकल्प शाखा) | -- | व्यवस्थापकीय संचालक |

टीप : महामंडळाचा हेल्पलाईन क्र.०२२-२२६७२२९३ असा आहे.

07 10 2021

# परिशिष्ट-२

## कार्यपुर्तीचे वेळापत्रक

| अ. क्र. | विभागाकडून / कार्यालयाकडून पुरविली जाणारी सेवा | आवश्यक कागदपत्रांची पूर्तता केल्यानंतर किती कालावधीत सेवा पुरविली जाते | सेवा पुरविणारे अधिकारी / कर्मचारी (दालन क्र. व दूरध्वनी क्र./विस्तार क्र.) | सेवा पुरविण्याच्या कार्यपध्दतीचे मुल्यमापन | सेवा विहित कालावधीत पुरविली न गेल्यास ज्यांच्याकडे तक्रार करता येईल तो अधिकारी व त्याचा दूरध्वनी क्रमांक |
|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ |
| १ | प्रशासन विभाग<br><br>(प्रशासकीय विभागाची आस्थापना, रजा प्रशिक्षण, महामंडळाच्या नियंत्रणाखाली क्षेत्रिय कार्यालयाची देखरेख, प्रतिनियुक्ती / कंत्राटी कर्मचारी व रोजंदारी कर्मचारी | १० - ३० दिवस | उप व्यवस्थापक / सहाय्यक व्यवस्थापक | | व्यवस्थापकीय संचालक |
| २ | प्रकल्प विभाग<br><br>१) अर्जाची छानननी<br>२)संचालक मंडळाची मान्यता<br>३) मंजुरी पत्र पाठविणे<br>४)वैधानिक दस्तऐवज प्राप्तीनंतर कर्जाची रक्कम NEFT द्वारे वितरित करणे. | ०८ दिवस<br>३०-९० दिवस<br>८-१० दिवस<br>८ दिवस | सहाय्यक व्यवस्थापक | -- | व्यवस्थापकीय संचालक |
| ३ | लेखा विभाग<br><br>मुख्यालय व जिल्हा कार्यालयातील संबंधित लेखा विषयक बार्बीचे कामकाज पाहणे, लेखा परिक्षण व रोख शाखा, लेखा परिक्षण अहवाल छपाई व शासनास सादर करणे. | १० - ३० दिवस | लेखाधिकारी / सहाय्यक व्यवस्थापक / सहाय्यक (लेखा) | -- | व्यवस्थापकीय संचालक |
| ५ | माहिती विभाग<br><br>(माहिती अधिकार अधिनियम, २००५ अन्वये प्राप्त अर्जावर कार्यवाही) | ३० दिवस | सहाय्यक व्यवस्थापक / (लिपिक-टंकलेखक) | -- | व्यवस्थापकीय संचालक |